माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**
**तक्रार क्रमांक : १८/२०२२**

तक्रारकर्ता, श्री.गजानन आत्माराम डोलारकर,
मु.पो.वसंतनगर, ता.मानोरा, जि.वाशिम

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, मानोरा, ता.मानोरा, जि.वाशिम

प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय, मानोरा, ता.मानोरा, जि.वाशिम

तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : १५.०२.२०२४

तक्रारकर्ता : उपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्जाचा दिनांक |
|---|---|---|
| ०९.०१.२०२१ | -- | १७.०२.२०२२ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) नूसार द्वितीय अपील क्र.५२३/२०१८ दि.०९.०१.२०२१ रोजी पारित केलेल्या आदेशानूसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीवर दिनांक १५.०२.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानूसार आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच उत्तरवादी अनुपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नूसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील (अपील क्र. ५२३/२०१८) मध्ये दिनांक ०९.०१.२०२१ रोजी सुनावणी घेवून "१. अपिलार्थीस अद्यापही माहिती देण्यात आली नसल्यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जोडपत्र-अ नूसार मागितलेली माहिती नोंदणीकृत डाकेने विनाशुल्क पुरवावी व तसा अनुपालन अहवाल हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या मुदतीत आयोगास सादर करावा. २. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.परशुराम भोसले यांनी, त्यांना अपिलार्थीकडून कलम ६ (१) नूसार प्राप्त झालेला माहितीचा अर्ज ३० दिवसाचे विहीत मुदतीत निकाली न काढून कलम ७ (१) चा भंग केला म्हणून कलम २० (१) व कलम १९ (८)(ग) नूसार त्यांना रु.२५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) ची शास्ती

करण्यात येते. जन माहिती अधिकाऱ्याचे आंहरण व संवितरण अधिकारी यांनी सदर शास्तीची रक्कम १ महिन्याच्या आत वसूल करुन तसा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. ३. अपिलार्थीने कलम ६(१) नूसार अर्ज करुन मागितलेली माहिती प्रदान करण्यास अनुज्ञेय असतांना देखील तिचे अपिलार्थीस वेळेत प्रदान झाले नाही. परिणामी त्यांना शारीरिक, मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागला म्हणून कलम १९ (८)(ख) च्या तरतुदीनूसार अपिलार्थीस रु.५०००/- ची नूकसान भरपाई अदा करण्याची शिफारस करण्यात येत आहे. सार्वजनिक प्राधिकरणाने प्रस्तुत आदेश पारित झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाचे आत अपिलार्थीस धनादेशाद्वारे नुकसान भरपाईची अदायी करुन अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा." असे आदेश पारित केले होते.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व तक्रारकर्ता यांचे युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, तक्रारकर्ता श्री.गजानन डोलारकर यांचे द्वितीय अपील क्र. ५२३/२०१८ यात दि.०९.०१.२०२१ रोजी पारित केलेल्या आदेशाचे अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.परशुराम भोसले तहसिल कार्यालय, मानोरा यांचेविरुध्द रु.२५,०००/- शास्तीची कार्यवाही करण्यात आली असून, कलम १९ (८)(ख) च्या तरतुदीनूसार तक्रारकर्त्यास रु.५०००/- नूकसान भरपाई सुध्दा ३० दिवसाच्या आत देण्याबाबत निर्देश देण्यात आले होते. तक्रारकर्ता यांना आदेशातील परिच्छेद १ नूसार माहिती प्राप्त झाली असून रु.२५,०००/- शास्तीचा भरणा देखील करण्यात आलेला आहे मात्र अद्यापही नूकसान भरपाई प्रदान करण्यात आली नाही. यात तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या तक्रार अर्जात तत्कालीन तहसिलदार यांना याबाबतीत न्यायालयाने वरील आदेशाला स्थगनादेश दिला असल्याचे नमूद केले असून, प्रस्तुत प्रकरणी विद्यमान तहसिलदार, मानोरा यांनी तक्रारकर्ता यांना नूकसान भरपाई देण्याबाबत पत्र देखील निर्गमित केले असून त्याची अद्यापही अंमलबजावणी झाली नसल्याचे नमूद केलेले आहे. जर उपरोक्त दि.०९.०४.२०२१ रोजीच्या आदेशाला स्थगनादेश नसल्यास यातील परिच्छेद ३ नूसार कलम १९ (ख) अन्वये शिफारस केलेली रु.५०००/- नूकसान भरपाई अदा करण्या विषयी सार्वजनिक प्राधिकरणाला दिलेल्या निर्देशाचे अनुपालन विद्यमान तहसिलदार, तहसिल कार्यालय, मानोरा जि.वाशिम यांना वरील आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत प्रदान करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून तक्रार अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : १५.०२.२०२४**

जावक क्रमांक 32EU दिनांक 07 MAY 2024

Vishal D. Ingale-2024/